# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २०७ वा गुरूवार दि.१८ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB, Racold, legrand, HAVELLS, LAT SWITCHGEAR, INDOASIAN, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, GreatWhite, SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


## अखेर प्रकाश आंबेडकरांना राम मंदिर सोहळ्याचे निमंत्रण, पण आभार मानत दिलेल्या उत्तराने भूवया उंचावल्या!



मुंबई– अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या राम मंदिर सोहळ्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनाही श्री रामजन्मभूमी ट्रस्टकडून निमंत्रण मिळाले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी निमंत्रण आल्यानंतर ट्रस्टच्या निमंत्रणावर आभार व्यक्त करताना सोहळ्यास उपस्थित राहण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. त्यांनी सोहळ्याला उपस्थित न राहण्याचे कारण सुद्धा सांगितले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी निमंत्रण आल्यानंतर ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांना पत्र पाठवत नाराजी व्यक्त केली आहे. जप–आरएसएसने आपल्या राजकीय फायद्यासाठी हा कार्यक्रम घेतल्याचे त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी काय म्हटलं आहे?

अयोध्येतील श्री रामजन्मभूमी मंदिराच्या अभिषेकासाठी मला आमंत्रित केल्याबद्दल धन्यवाद. या कार्यक्रमाला मी उपस्थित राहणार नाही. मी उपस्थित न राहण्याचे कारण म्हणजे भाजप आणि आरएसएसने हा कार्यक्रम हायजॅक केला आहे. धार्मिक सोहळा हा निवडणुकीच्या फायद्यासाठी राजकीय प्रचार बनला आहे. ते पुढे म्हणतात, माझे आजोबा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी इशारा दिला होता की राजकीय पक्षांनी धर्म, पंथ यांना देशाच्या वर ठेवला तर आमचे स्वातंत्र्य दुसर्यांदा धोक्यात येईल आणि या वेळी कदाचित आम्ही ते कायमचे गमावू. आज ही भीती खरी ठरली आहे. धर्म आणि पंथाला देशापेक्षा वरचे स्थान देणाऱ्या भाजप–आरएसएसने आपल्या राजकीय फायद्यासाठी हा कार्यक्रम घेतला आहे.

शरद पवारांचं श्रीरामजन्मभूमीच्या सरचिटणीसांना पत्र

दुसरीकडे, शरद पवार यांना सुद्धा निमंत्रण देण्यात आलं आहे. सोहळ्याचं निमंत्रण दिल्याबद्दल शरद पवार यांनी श्रीरामजन्मभूमीच्या सरचिटणीस चंपत राय यांचे आभार मानताना २२ जानेवारीनंतर रामलल्लाचं दर्शन घेणार असल्याचे सांगितले आहे. तोपर्यंत राम मंदिराचे काम पूर्ण झालं असेल, असा उल्लेख पत्रात केला आहे. निमंत्रण आल्यानंतर शरद पवार म्हणाले की, अयोध्येला मी नक्की जाणार, पण २२ जानेवारीनंतर जाणार आहे. मोठ्या संख्येने या ठिकाणी रामभक्त येथील. त्यामुळे २२ जानेवारीनंतर रामलल्लाचे दर्शन घेण्यासाठी जाणार आहे.

## लातुरात बसपा सुप्रिमो बहन कुमारी मायावती यांचा वाढदिवस उत्साहात साजरा




लातूर : बहुजन समाज पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष अर्थाता सुप्रिमो तथा उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री बहन कुमारी मायावती यांचा वाढदिवस लातूर शहरातील विविध भागात केक कापून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विशेषम्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे बहन कुमारी मायावती यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात शेकडो महिलांनी बहुजन समाज पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.यावेळी बसपाचे लातूर जिल्हाध्यक्ष विश्वनाथ आल्टे व पदाधिकाऱ्यांनी पार्टीत प्रवेश करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांचे स्वागत केले. बसपाच्या राष्ट्रीय अध्यक्षा बहन मायावती यांनी आपल्या वाढदिवसाच्या औचित्यावर देशभरात बसपा स्वबळावर स्वतंत्रपणे लोकसभेच्या निवडणुका लढवणार असल्याची घोषणा केली. त्यामुळे बसपा लातूर जिल्ह्यात लोकसभेची निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढवन्याच्या तयारीत असल्याचे बसपा जिल्हाध्यक्ष विश्वनाथ आल्टे यांनी यावेळी सांगितले. लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, इंदिरानगर, बौद्ध नगर, सिद्धेश्वर नगर, आनंदनगर, गावभाग, कृपा सदन शाळेजवळ अशा अनेक भागात बहन कुमारी मायावती यांचा वाढदिवस केक कापून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी बसपाचे लातूर जिल्हाध्यक्ष विश्वनाथ आल्टे, जिल्हा प्रभारी उदय सोनवणे, सचिव श्रीधर शेवाळे, महासचिव ज्योतीराम लामतुरे, विधानसभा अध्यक्ष रणधीर सुरवसे, सुखदेव राठोड, सुभाष सूर्यवंशी, गौतम वाघमारे, सिद्धार्थ सूर्यवंशी, शेखर मगर, ओम कांबळे, व्यंकट बरगे, अनिल कांबळे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती

## आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नामूळे जिल्हा नियोजन समितीतून यात्रास्थळ व रस्त्याच्या कामांसाठी ५ कोटी २२ लाखाचा निधी मंजूर

लातूर दि.१७ – लातूर जिल्हा नियोजन समितीच्या २०२३–२४ योजने अंतर्गत भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून ग्रामीण विधानसभा मतदार संघातील जिल्हा आणि ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरणाच्या १८ कामासाठी ४ कोटी ५६ लक्ष रुपयांचा आणि यात्रास्थळांच्या विकासाठी अनुदान अंतर्गत ९ कामासाठी ६६ लक्ष ९५ हजार रुपये असा एकुण ५ कोटी २२ लक्ष ९५ हजार रुपये एवढा निधी मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने त्या–त्या गावातील आणि परिसरातील भाजपा कार्यकर्त्यांसह सर्व स्तरातील नागरिकांनी आ. कराड यांच्या आभार व्यक्त केले आहेत.

जिल्हा वार्षिक योजना २०२३–२४ अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावच्या रस्त्यांना मंजुरी मिळावी, रस्त्याची दुरुस्ती व्हावी त्याचबरोबर तिर्थक्षेत्रांचा विकास व्हावा यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गिरीशजी महाजन साहेब यांच्याकडे भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत ९ कामांना आणि ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत ९ अशा एकूण १८ रस्त्याच्या कामाकरिता ४ कोटी ५६ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. तर ८ ठिकाणच्या यात्रा स्थळांच्या विविध ९ विकास कामासाठी ६६ लक्ष ९५ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत रामा २४८ ते मोहगाव रस्ता पुलाचे व जोड रस्त्याचे काम करणे १० लक्ष, प्रजिमा ५९ ते धनेगाव–उमरगा प्रतिमा १६ पर्यंतचा रस्ता पुलाचे व जोडरस्त्याचे काम करणे १० लक्ष, टाकळगाव घनसरगाव मोहगाव रस्त्याचे मजबुतीकरण करणे ४६ लक्ष, रुपये इजिमा १२० ते वरवडा रस्ता दुरुस्त करणे ३५ लाख रुपये, इजिमा ११९ रिंगणी गुळखेडा रोड नाल्यावर पोहच मार्गासह पुलाचे बांधकाम करणे ५० लक्ष, इंदरठाणा ते नागझरी इजिमा २० रस्ता पुलाचे व जोडरस्त्याचे काम करणे १० लक्ष, समदर्गा–कोरंगळा–येल्लोरी रस्ता सुधारणा करणे ४० लक्ष, रामा २४८ ते चिकलठाणा भातांगळी रस्ता पुलाचे व जोडरस्त्याचे काम करणे १० लक्ष, रामा २४८ ते चिकलठाणा ते इजिमा ११ भातांगळी रस्ता पुलाचे व जोडरस्त्याचे काम करणे १० लक्ष, आणि ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत काटगाव ते लमाणतांडा रस्ता सुधारणा करणे २० लक्ष, खरोळा–कुंभारवाडी रस्ता सुधारणा करणे ६० लक्ष, तांदुळवाडी ते ग्रा.मा.८२, रामा–०९ रस्ता पुलाचे व जोडरस्त्याचे



काम करणे १० लक्ष, तांदुळवाडी ते टाकळी फाटा पर्यंतचा रस्ता व पुलाचे व जोड रस्त्याचे काम करणे १० लक्ष, तांदुळवाडी ते सामनगाव रस्ता ग्रा.मा. २४ ची सुधारणा करणे २० लक्ष, मोटेगाव ते धानोरा ग्रा.मा. ११८ रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ५५ लक्ष, राज्य ग्रामीण मार्ग २४५ ते रामवाडी ग्रामीण मरस्ता ७० रस्ता व पुलाचे व जोड रस्त्याचे काम करणे १० लक्ष, वानवडा ते शिवली मोड ग्रा.मा. ७४ रस्ता सुधारणा करणे ३० लक्ष, इजिमा–२० ते ब्रम्हवाडी रस्ता व पुल ग्रा.मा. ७६ ची सुधारणा करणे २० लक्ष याप्रमाणे लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील १८ कामाकरीता तब्बल ४ कोटी ५६ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून लातूर ग्रामीण मतदार संघातील भादा सर्कलमधील अंदोरा येथे हजरत अमुशावली बाबा दरगाह येथे भक्त निवास बांधकाम करणे ५ लक्ष ५० हजार, बोरगाव न. येथे नकुलेश्वर मंदिर परिसरात विविध विकास कामे करणे १७ लक्ष ७५ हजार, रेणापूर तालुक्यातील खरोळा येथे श्री दत्त मंदिर देवस्थान येथे बांधकाम आणि विद्युतीकरण करणे १५ लक्ष ५० हजार, लातूर तालुक्यातील निळकंठ येथे निळकंठेश्वर मंदिर परीसर विकसीत करणे ७ लक्ष, निवळी येथे ज्योतिबा मंदिर परिसर विकसीत करणे ५ लक्ष २० हजार, भिसे वाघोली येथील भगवती मंदिर परीसराचे सुशोभिकरण करणे २ लक्ष, सलगर बु. येथे खंडोबा मंदिर तिर्थक्षेत्र परीसरात पाणीपुरवठा व हायमस्ट पथिदिवे बसविणे ९ लक्ष, सोनवती येथे खंडोबा मंदिर परिसर सुधारणा करणे ५ लक्ष याप्रमाणे ९ यात्रा स्थळांच्या विकासासाठी ६६ लक्ष ९५ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याबद्दल आ. रमेशअप्पा कराड यांचे त्या–त्या गावातील आणि परिसरातील भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यापासून लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात खेड्यापाड्यात शासनाच्या योजनेच्या माध्यमातून भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांना विविध विकासाची कामे मंजूर करण्यात आणि त्यासाठी लागणारा कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेण्यात मोठे यश आले आहे. यामुळे गावा गावात विकासाची कामे मोठ्या प्रमाणात होत असून विकासाला मोठी गती मिळाली आहे. भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड म्हणजे धडाडीचे आमदार कामगिरी दमदार असेच ग्रामीण भागातील जनतेतून बोलले जात आहे.

## आमदार धिरज देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे रस्ते होणार दर्जेदार



लातूर : प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत अडीच कोटी रुपयांच्या विकासकामांना मान्यता मिळवून दिल्यानंतर 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी आता 'जिल्हा नियोजन'मधून मतदारसंघातील रस्ते आणि पुलांसाठी तब्बल साडेचार कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. त्यामुळे मतदारसंघातील वेगवेगळे रस्ते आता दर्जेदार होतील. 'लातूर ग्रामीण'मधील रस्त्यांचा दर्जा सुधारावा यासाठी आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख हे सातत्याने प्रयत्नशील आहेत. याबाबत पालकमंत्री श्री. गिरीश महाजन यांच्याकडे त्यांनी निधीची मागणी केली होती. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून १८ रस्त्यांसाठी सुमारे साडेचार कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. याबद्दल आमदार श्री. धिरज देशमुख यांनी पालकमंत्री श्री. महाजन यांचे आभार मानले.

ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेतून लातूर तालुक्यातील काटगाव येथे काटगाव ते लमाणतांडा रस्ता ग्रामा १९ ची सुधारणा, तांदुळवाडी येथे तांदूळवाडी ते ग्रामा ८२, रामा ९ रस्ता पुलाचे व जोड रस्ते, तांदूळवाडी ते टाकळी फाटा पर्यंत रस्ता पुलाचे व जोड रस्ते, तांदूळवाडी ते सामानगाव रस्ता ग्रामा २४ ची सुधारणा, रेणापूर तालुक्यातील खरोळा येथे खरोळा ते कुंभारवाडी रस्ता ग्रामा ७१ ची सुधारणा, मोटेगाव येथे मोटेगाव ते धानोरा ग्रामा ११८ रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण, रामवाडी ख. येथे राज्य ग्रामीण मार्ग २४५ ते रामवाडी ग्रामीण मार्ग ७० रस्ता पुलाचे व जोड रस्त्याचे काम, ब्रम्हाडी येथे इजिमा २० ते ब्रह्मवाडी रस्ता व पुल ग्रामा ७६ ची सुधारणा, औसा तालुक्यातील वानवडा येथे वानवडा ते शिवली मोड ग्रामा ७४ रस्ता सुधारणा करणे ही कामे होणार आहेत.

इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेतून रेणापूर तालुक्यातील मोहगाव (तळणी) येथे रामा २४८ ते मोहगाव इजीमा १० रस्ता पुलाचे व जोड रस्त्याचे काम, टाकळगाव येथे टाकळगाव–घनसरगाव–मोहगाव रस्ता मजबुतीकरण करणे, इंदरठाणा येथे इंदरठाणा ते नागझरी ईजिमा २० रस्ता पुलाचे व जोड रस्ता काम, लातूर तालुक्यातील धनेगाव येथे प्रजिमा ५९ धनेगाव उमरगा ते प्रजीमा १६ पर्यंतचा रस्ता पुलाचे व जोड रस्त्याचे काम, चिकलठाणा येथे रामा २४८ ते चिकलठाणा इजीमा ११ भातांगळी रस्ता प्रजिमा १९ रस्ता पुलाचे व जोड रस्त्याचे काम, चिकलठाणा येथे रामा २४८ ते चिकलठाणा ते इजीमा ११ भातांगळी रस्ता प्रजिमा १९ रस्ता पुलाचे व जोड रस्त्याचे काम, औसा तालुक्यातील वरवडा येथे इजीमा १२० ते वरवडा इजिमा ११९ रस्ता सुधारणा करणे, रिंगणी येथे इजिमा ११९ रिंगणी गुळखेडा रोड नाल्यावर साखळी क्रमांक १०/५०० वर पोहोच मार्गासह पुलाचे बांधकाम करणे, समदर्गा येथे समदर्गा कोरंगळा येल्लोरी इजिमा ११७ (४/०० ते ५/५००) रस्ता सुधारणा करणे अशी विविध कामे होणार आहेत.

## (बिएसपी) सुप्रिमो बहन : मायावतीजी यांचा वाढदिवस जनकल्याणकारी दिवस चेंबूर येथील (बिएसपी) भवनात उत्साहात साजरा




ब्रह्मण मुंबई / चेंबूर (प्रतिनिधी) :– दिनांक :१५ जानेवारी २०२४ रोजी बहुजन समाज पार्टी च्या राष्ट्रीय अध्यक्षा बहन कुमारी मायावतीजी यांच्या ६८ व्या वाढदिवसा निम्मित 'जनकल्याणकारी दिवस' बीएसपी भवन चेंबूर, प्रदेश कार्यालय मुंबई येथे मुंबई अध्यक्ष प्रा. प्रविण धोत्रे यांच्या नेतृत्वाखाली जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक : महाराष्ट्रराज्याचे प्रदेश उपाध्यक्ष ड. संदीप ताजने यांनी उपस्थित पदाधिकारी कार्यकरते यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र प्रदेश महासचिव प्रशांत इंगळे, ( मुंबई झोन ) मुंबई अध्यक्ष प्रा. प्रवीण धोत्रे, रामसुमेर जैस्वार मुबई मुख्य संयोजक, मुंबई प्रभारी श्यामलाल जैस्वाल, सुरेश महाडिक, संतोष अडसूळ, पंकज जाधव, मिलरीपली प्रियदर्शी, ड. प्रणाली पाते, मुंबई उपाध्यक्ष शैलेश पवार, यांच्यासह उपस्थित सर्व जिल्हा अध्यक्षांनी बहन मायावतीजी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी महापुरुषोंके सन्मान मे बिएसपी मैदान मे, बहन मायावतीजी जिंदाबाद ! मा. आकाश आनंद जिंदाबाद !! च्या घोषणा यावेळी देऊन बहनजींचा जनकल्याणकारी दिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. त्यावेळी शेकडोंच्या संख्येत पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय....

### साखर कारखानदारीला दिलासा

नोंद : साखर कारखानदारीला दिलासा साखर कारखानदारीसंदर्भात अनेक दशकांपासून प्रलंबित प्राप्तीकराचा मुद्दा शासनाने नुकताच मार्गी लावला आहे. साखर कारखान्यांना उसाला उच्च मूल्य दिल्याने अतिरिक्त प्राप्तीकर भरण्याची गरज राहिली नाही.केंद्र सरकार सहकारी कारखान्यांचा प्राप्तीकराशी संबंधित अनेक वर्षांपासूनचा रेंगाळलेला मुद्दा निकाली काढण्याच्या दृष्टीने पावले टाकत आहे. सहकार मंत्री अमित शहा यांच्या प्रयत्नातून प्राप्तीकरासंबंधीचा मुद्दा मार्गी लावण्यासाठी २०२३-२४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात काही तरतुदी करण्यात आल्या. केंद्र सरकारने २०१६च्या कायद्यात बदल करत साखर कारखान्यांना दिलासा दिला आहे.एफआरपीपेक्षा अधिक रक्कम ही नफा म्हणून गृहित धरली जात असल्याने साखर कारखान्यांना प्राप्तीकर भरणे अपरिहार्य होते. आता त्यात स्टेट ॲथॉरिटी आणि अन्य कायदेशीर मार्ग उपलब्ध करून दिल्याने कारखानदारांना दिलासा मिळाला आहे. कारखान्यांकडून उसाला वाजवी आणि किफायतशीर दर (एफआरपी) किंवा किमान हमी भावापेक्षा (एमएसपी) पेक्षा अधिक दर हा ऊस खरेदीचा खर्च समाजावा आणि त्यावर प्राप्तीकर आकारला जाऊ नये, असा महत्त्वाचा बदल केंद्र सरकारने केला. त्यामुळे साखर कारखान्यांची प्राप्तीकरातून सुटका झाली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२६ पासून करण्यात येणार आहे. यासाठी प्राप्तीकर कायद्याच्या कलम १५५ मध्ये नवे पोटकलम १९(१) चा समावेश करण्यात आला आहे.सीबीडीटीने जुलै २०२३ रोजी यासंदर्भातील आदर्श संचालन प्रक्रियादेखील जारी केली. 'नॅशनल फेडरेशन ॲण्ड को ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरिज लिमिटेड'ने सादर केलेल्या अहवालानुसार या बदलामुळे सहकारी साखर कारखान्यांना ४६,५२४ कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. त्यामुळे अनेक दशकांपासून प्रलंबित प्राप्तीकराचा मुद्दा मार्गी लागला. त्यामुळे एकप्रकारे ऊस उत्पादकांना दिलासा मिळाला आहे. साखर कारखान्यांना उसाला उच्च मूल्य दिल्याने अतिरिक्त प्राप्तीकर भरण्याची गरज राहिली नाही. या तरतुदीमुळे कारखान्यांना संचालकांच्या उस-ला अधिक दर देता येणार आहे आणि या जादा दराच्या खर्चापोटी प्राप्तिकरात सवलत मिळवता येणार आहे. या बदलामुळे सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून संचालक शेतकर्यांना चांगला फायदा मिळत आहे. या निर्णयामुळे खासगी कारखान्यांना देखील योग्य मूल्य देण्यास बांधिल राहावे लागेल. परिणामी सरकारचा हा निर्णय ऊस उत्पादकाच्या हिताचा मानला जात आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ (एनसीडीसी)च्या माध्यमातून दहा हजार कोटी रुपयांची कर्ज योजना सहकारी मंत्रालयाने अनुदान सहायता नावाने सुरू केली आहे. यानुसार भारत सरकार २०२२-२३ पासून २०२३-२४ पर्यंत 'एनसीडीसी'ला दरवर्षी एक हजार कोटी रुपयांचे अनुदान देत आहे. या अनुदानाचा वापर सहकारी कारखान्यांना दहा हजार कोटी रुपयांपर्यंत कर्ज देण्यासाठी होणार आहे. या कर्जाच्या मदतीने सहकारी साखर कारखान्यांना इथेनॉल प्रकल्प सुरू करणे किंवा कोजनरेशन प्लँट किंवा अन्य संबंधित कामासाठी किंवा तिन्ही काम करता येणार आहे. आतापर्यंत 'एनसीडीसी'ने २४ सहकारी साखर कारखान्यांना ३०१०.५७ कोटी रुपये अनुदान दिले आहे.पेट्रोलियम मंत्रालय सहकारी साखर कारखान्यांकडून इथेनॉलची खरेदी ही एखाद्या खा-सगी कंपन्याप्रमाणे करणार आहे. उसाच्या पाचटापासून कोजन वीज प्रकल्प उभारणीवर काम केले जात आहे. सहकारी साखर कारखान्यांना मदत करण्यासाठी मळीवर जीएसटी हा २८ टक्क्यांवरून ५ टक्के करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे डिस्टलरिजच्या लिक्विडीटीत वाढ होईल. कारण मळी हा त्यांच्यासाठी कच्चा माल आहे. कमी जीएसटी असल्याने त्यांचा खर्च आपोआप कमी होईल. सहकारी साखर कारखान्याकडे इथेनॉल किंवा डिस्टलरिज प्लँट नसतील ते उसाची मळी अधिक मार्जीनने डिस्टलरीला विकून अधिक नफा कमवू शकतात.तूर्त यानुसार केंद्र सरकारने सहकारी बँकांच्याही अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. सहकार मंत्री अमित शहा यांच्या प्रयत्नामुळे सहकारी बँकांना येणार्या संभाव्य अडचणी दूर करण्यासाठी 'आरबीआय'मार्फत महत्त्वाचे निर्णय घेतले. इथे काही महत्त्वाच्या निर्णयाचा विचार करता येईल. व्यवसायवाढीसाठी शहरी सहकारी बँका आता नवीन शाखा सुरू करू शकतात. सहकारी बँक देखील वाणिज्यिक बँकेप्रमाणे एका हप्त्यात कर्ज फेडू शकणार आहेत. शहरी सहकारी बँकांना 'प्रायोरिटी सेक्टर लेंडिंग'चे ध्येय साध्य करण्यासाठी अतिरिक्त कालावधी दिला आहे. शहरी सहकारी बँकांच्या नियमित संवादासाठी 'आरबीआय'मध्ये एक नोडल अधिकारी नेमला आहे.आता जिल्हा केंद्रीय सहकारी बँकांना नवीन शाखा सुरू करणे आणि एटीएम सुरू करणे किंवा कार्यालयाचे ठिकाण बदलण्याची परवानगी असेल. आता शहरी सहकारी बँका ग्राहकांना घरबसल्या बँकिंग सेवा देऊ शकणार आहेत. ग्रामीण आणि शहरी सहकारी बँकांना वैयक्तिक कर्जाची मर्यादा ही दुपटीपेक्षा अधिक वाढविली आहे.अलीकडच्या गाइडलाइननुसार ग्रामीण सहकारी बँक आता वाणिज्यिक रिअल इस्टेट आणि निवासी क्षेत्राला कर्ज देऊ शकणार आहे आणि त्यामुळे त्यांना व्यवसायात विस्तार करता येणार आहे. सहकारी बँकांना 'सीजीटीएमएसई'चे सदस्यत्व दिले आहे. त्यामुळे आता सदस्य बँका कर्जासाठी ८५ टक्क्यांपर्यंत जोखीम उचलण्याचा लाभ घेऊ शकतात. त्याचबरोबर सहकारी तत्त्वावर आधारित उद्योगांना देखील सहकारी बँकांकडून 'कोलरेटल मुक्त' कर्ज मिळू शकेल.

# मकरसंक्रांत निमित्ताने सर्व महिलांनी कायदेशीर विवाह नोंदणी व एकल महिलांची स्वतंत्र नोंद करावी

दर वर्षी मकरसंक्रांत जानेवारी महिन्यात विवाह नोंदणी, व एकल महिलांच्या स्वतंत्र नोंद करण्यासाठी ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत माहितीपत्रक लावणे व आज च्या काळाची गरज आहे. कोर्ट प्रकरणे, कौटुंबिक, हिंसाचारच्या केसेस रोखणे, एकल महिलांचे प्रमाण कमी होईल, बाल विवाह कमी होईल, कोर्टात प्रलंबित प्रॉपर्टी संदर्भात केसेस निकाल लवकर लागतील. आत्महत्या चे प्रमाण कमी होईल, कुटुंब उध्वस्त होणार नाही, आरोग्यचे प्रश्न निर्माण होणार नाही, शासनाच्या विविध योजना मिळण्यास उपयोग होईल. हे प्रश्न सर्व एकमेकांवर अवलंबून आहेत. एकल महिला संघटना ही महिलांच्या आरोग्य, रोजगार, आर्थिक, राजकिय, हिंसाचार, समाजातील अनिष्टरुढी परंपरांना छेद देणे, व महिलांना संपत्तीत अधिकार प्राप्त होण्यासाठी व महिलांना समाजात सन्मानाची वागणूक मिळावी, तिचा हक्क व अधिकार तिला मिळाला पाहिजे यासाठी संघटना काम करत आहे. समाजात वावरताना आपणास एकल महिला मोठया संख्येने समोर दिसत आहेत यामध्ये ( विधवा, परित्यक्ता, घटस्फोट झालेल्या, पतीला सोडलेल्या (चछ्छ), पतीने सोडलेल्या, व्यसनाने त्रासलेल्या, अपंग, प्रौढ कुमारी) या प्रकारच्या एकूण ६० टक्के महिलांचा समावेश होतो. आपल्या भारतीय संस्कृतीत विवाह सोहळा समाजाने रीतसर पतिपत्नी यांना मान्यता देण्यात आली आहे. तसेच आपल्याकडे लग्न हे वेगवेगळ्या पद्धतीने केले जाते मंदिरात, घरासमोर कमी लोकांच्या उपस्थितीत, खूप मोठ्या संख्येने उपस्थित असलेले मोठया थाटात, कोर्टात, नुसते मंदिरात हार घालून फोटो काढले जातात. वेगवेगळ्या धर्माचे पद्धतीने देखील लग्न लावले जातात. आणि यात सर्व गोष्टी लक्षात घेता खरा कायदेशीर मान्यता कोणत्या पद्धतीने लग्न लावले तर आहे तर ते कायदेशीर कोर्ट मॅरेज ला दुसरे म्हणजे आपण कोणत्याही पद्धतीने लग्न केले तरी त्याची रीतसर विवाह नोंदणी करावी लागते. मग ती ग्रामीण भागात लग्न झाले तर ग्रामपंचायत ला, शहरात लग्न झाले तर नगरपरिषद ला, तर जिथे लग्न झाले किंवा सासरी ग्रामपंचायत च्या ठिकाणी ही विवाह नोंदणी करणे गरजेचे असते व कोर्टात केले तर मग अडचण नाही तीच विवाह नोंदणी पक्की खात्रीशीर आहे.

विवाह नोंदणी करणे का गरजेचे आहे

विवाह नोंदणी हा कायदा महाराष्ट्र विवाह नोंदणी अधिनियम १९९८- ९९ नुसार नोंदणी होणे गरजेचे आहे. जर महिलांकडे विवाह नोंदणी प्रमाणपत्र नसेल तर तुम्ही कायदेशीर पत्नी नाहीत व त्यामुळे आयुष्यात आलेल्या अनेक समस्यांना तोंड देण्यासाठी तुम्हाला तयार राहावं लागेल कारण ते प्रमाणपत्र महिलांच्या खूप फायदेशीर आहे.

विवाह नोंदणी केल्यास त्याचे अनेक फायदे आहेत. ज्याचा महिलांना उपयोग होतो. १) लग्नानंतर महिलेचे नाव बदलते त्यामुळे ओळखीचा एक महत्त्वाचा पुरावा तयार होतो. २) विवाहित महिलांना सासरच्या संपत्ती मध्ये अधिकार मिळण्यासाठी पुरावा म्हणून याचा उपयोग होतो ३) पती असताना व पती निधनानंतर आर्थिक व इतर स्वरूपाचे लाभ मिळण्यासाठी उपयोग होतो. ४) वैवाहिक जीवनात समस्या आल्यास कोर्टात व अनेक विवाह नोंदणी प्रमाणपत्राचा उपयोग होऊ शकतो. ५) शासनाच्या अनेक योजनांचा लाभ मिळवण्यासाठी या प्रमानपत्राचा उपयोग होतो. ६) लग्नानंतर निवडणूक लढवण्यासाठी महिलेला याचा उपयोग होतो ७) मतदान यादीला नाव ॲड करण्यासाठी याचा उपयोग होतो. आज वयाच्या कोणत्याही टप्प्यावर महिलेला घराबाहेर काढले जाते तेव्हा ती कायदेशीर लग्न झाले नसते, आधारकार्ड बनवलेले नसते त्यामुळे रेशनकार्ड वर नाव नसते, दुसरे म्हणजे सवतीवर दिलेले असल्याने त्याच नावावर दुसऱ्या पत्नीला बोललं जातं त्यामुळे तीच स्वतः चा पुरावाच नसतो. आणि असे अनेक गोष्टी लक्षात घेतल्या तर महिलांच्या नावे काहीच नसते. आज खर पाहिले महिला ८० टक्के शेती काम करतात. नोकरी करणाऱ्या महिला मोठ्या संख्येने आहेत. घरातल्या प्रत्येक ठिकाणी महिला संकटांचा सामना करते पतीच्या अनेक अडचणीत पत्नी उभी असते. कष्टाने जमा केलेले पैसे घरासाठी खर्च करते आज कितीही महिला शिकलेल्या असल्या तरी महिलांना आर्थिक साठी पुरुष निर्णय घेऊ देत नाही मी या ठिकाणी सर्व ठिकाणी होत असे म्हणणार नाही पण मला काम करताना समोर दिसल्या ती म्हणजे अनेक महिलांना बँक खाते नसणे, पॅनकार्ड नसणे, विवाह नोंदणी नसणे, बायको म्हणून तिच्या नावाचा पुरावाच महिलांकडे नाही. अशा अनेक महिलांच्या सोबत चर्चा करून विचार केला व डोकं सुन्न झाले. आपल्याकडे महिलांना दुय्यम स्थान आहेच पण आपण महिला पण विचार करत नाही. माझं स्वतः च काय अस्तिव आहे. माझी ओळख काय आहे? मी कोण आहे? २ मुलांची आई, नवऱ्याची बायको, फलाण्याची सून, आमदाराची बायको, नगरसेवक ची बायको, सरपंच ची बायको, डॉ ची बायको, वकिलाची बायको, तलाठ्याची बायको, ग्रामसेवक ची बायको, मास्तरांची बायको, आजी, सून, लेक, सासू तुझं स्वतः च काय ओळख आहे? घरात मला किती विचारात घेतले जाते, मला शेजारचे ओळखतात का? मला गावात, तालुक्यात, जिल्ह्यात माझी ओळख आहे का ? मी इतके रात्र रात्र राबते तरी मी कुठं आहे. मी अशा काही महिलांना भेटले ज्यांचे पतीचे निधन होऊन ७,ते ८ वर्षे झाले तरी नवऱ्याचे मृत्यु प्रमाणपत्र मिळाले नाही सासरच्यांनी दिले नाही. मी आशा महिलांना भेटले ज्यांनी दारुड्या नवऱ्याला १० वर्षांपूर्वी सोडले व अजून तिच्याकडे एकटी असल्याचा काही पुरावा नाही. मी अशा महिलांना भेटले ज्यांना मुले नाही घर नाही, शेती नाही अशा कष्टाने गांजून गांजून गेलेल्या महिला आहेत त्यांना रेशन, पेन्शन योजना मिळत नाहीत. मी मनोरुग्ण, भोळसर, अपंग महिलांना भेटले ज्यांना पुराव्याअभावी योजनांचा लाभ मिळत नाहीत व त्यांच्या मुलांना शिक्षणपासून वंचित राहावं लागतं. मी आज ही अशी महिलांना पाहिली ज्यांना स्वतः चे कागदपत्रे असून घरातील व्यक्तीकडून मागून घ्यावं लागतं. एका व्यक्तीने अनेक महिलासोबत लग्न करून तिला अर्धवट सोडतो व तिच्या मुलांची देखील जबाबदारी घेत नाही अशा प्रकारच्या महिलांना मी पाहिले जी ३,४ मुलांना घेऊन महिला स्वतः जबाबदारी घेते, त्या मुलांना मोठं करते, शिक्षण देते नोकरीला लावते, स्वतः च्या घरकाम, मोलमजुरी करुन कष्टतून घर घेते हिमतीने मुलीचं लग्न करून देते सर्वच करते सगळीकडेच ती असते . अशा महिलांना आपण का सपोट करत नाही तर नावे ठेवतो. अशा महिला आहेत ज्यांच्या नावे शेती आहे पण अजून सातबारा पाहिली नाही, ८ अ काय असते माहिती नाही. शेती असून त्याचा उपभोग घेऊ दिला जात नाही अशी अनेक उदाहरणे आहेत. मग महिला सरपंच ते राष्टपती पर्यंत महिला आहे पण ती फक्त नावालाच आणि म्हणतो की, महिलांना सर्व सुविधा आहे याचा विचार करायला हवा. मग ज्या महिला विधवा झाल्यानंतर तिला सुरक्षित का वाटत नाही असं काय होत की, ती व तिची मुलं परकी होतात? अस नेमकं काय होत की, ती दुष्मन वाटू लागते? ती माणूस राहत नाही का? ती मयत पतीच्या नावाने राहत नाही का? ती या समाजात समोर राहून स्वतः एक अस्तित्व निर्माण करते का? कोणतीही महिला ही पती गेल्यानंतर सुखी नाही राहू शकत का? तिने हसायला नको का? तिने स्वतः साठी सजायच नाही का? आज जिजाऊ सावित्रीबाई फुले, माता रमाई, राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे कार्य पाहून तरी आपण विचार करू व त्यांच्या विचारांचा एक भाग बनू शकतो का? आपण एक महिला म्हणून आई, बहीण, सून, मुलगी, नात, आजी अशा अनेक ठिकाणी असतो त्या त्या ठिकाणी जाऊन आपले कर्तव्ये व जबाबदारी पण स्वीकारली पाहिजे. आज समाजातील लोकांनी मानसिकता बदलणे गरजेचे आहे. आज महिलांना फक्त उपभोगाची वस्तू समजू नये तर तिचा आदर करून व पुरुषांच्या बरोबरीने ती उभी राहते तर जन्म देणारी ही महिलाच आहे व पदावर असणारे सर्व पुरुषच आहेत तेव्हा वरील सर्व कागदपतत्राची जास्त आवश्यकता महिलांना आहे. बदल होणे गरजेचे आहे व त्यासाठी आपली बुध्दी वृद्धिंगत होणे आवश्यक आहे. महिलेशिवाय पुरुष अधुरा आहे. आज बदल होणे महत्त्वाचे आहे. यामध्ये महिलांच्या बाजूने समजून घेणे आवश्यक आहे व ही जबाबदारी समाज,कुटुंबातील पुरुषांच्या बरोबर प्रशासन व शासन यांची देखील तेवढीच आहे. पण याकडे सर्वच ठिकाणी दुर्दैवाने सहकार्य तर नाही पण दुर्लक्ष केले जाते मागील काही वर्षपासून यासाठी प्रयत्न सुरू आहे.

महिलांचा सन्मान करणे हि प्रत्येकांची सामाजिक नैतिक जबाबदारी आहे.

------------

रुक्मिणी नागापुरे एकल महिला संघटना ९०४९०२५४१५

एकल महिला संघटना






# तलाठी भरती घोटाळा!

राज्यात सध्या घोटाळ्यांची स्पर्धा सुरू आहे. स्पर्धा परीक्षेत घोटाळा, आर्थिक घोटाळा, राजकारणात घोटाळा असे विविध क्षेत्रांतील घोटाळे गाजत आहेत. अशा घोटाळ्यांच्या चक्रव्यूहात आजची तरुणाई अडकली आहे. बेरोजगारीच्या समस्येने ग्रासलेली तरुणाई पोटाची खळगी भरेल या आशेने विविध स्पर्धा परीक्षांना सामोरी जाते परंतु परीक्षेची प्रक्रियाच पूर्ण होत नाही. परीक्षा होण्याआधीच पेपरफुटीचे गंडांतर येते आणि परीक्षार्थींचा अभ्यास, मेहनत वाया जाते. परीक्षा रद्द होतात आणि नव्याने परीक्षा घेतली जाईल अशी घोषणा केली जाते. परीक्षा होत असताना अनेक गैरप्रकार उघडकीस येऊन देखील कोणतीच कारवाई न होता काही परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यामुळे परीक्षार्थींमध्ये असंतोष धुमसतो आहे. तलाठी भरती परीक्षेतही असाच गैरप्रकार घडला. एकूण प्रकाराकडे होणा-या सरकारी दुर्लक्षाच्या विरोधात छत्रपती संभाजीनगर आणि बीडमध्ये हजारो परीक्षार्थी रस्त्यावर उतरले. सुरुवातीपासूनच गोंधळात अडकलेल्या तलाठी भरती परीक्षेचा निकालही गोंधळ उडवणाराच होता.

त्याआधी वनरक्षक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना अतिशय कमी गुण होते ते विद्यार्थी तलाठी परीक्षेत मात्र अव्वल गुणांनी उत्तीर्ण झाल्याचे समोर आले आहे. हे विद्यार्थी पैकीच्या पैकी नव्हे तर त्यापेक्षाही अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले. काही जणांना २०० पैकी २१४ गुण मिळाले म्हणे! हा काय प्रकार आहे? आधीच्या परीक्षेत नापास झालेले विद्यार्थी तलाठी भरती परीक्षेत सर्वाधिक म्हणजेच एकूण गुणांपेक्षा अधिक गुणांनी पास होतात कसे? या निकालावर स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने देखील आक्षेप घेतला आहे. तलाठी होण्यासाठी विद्यार्थ्यांना संघर्ष करावा लागतोय. महसुली व्यवस्थेतील तलाठी पद हे अतिशय महत्त्वाचे पद आहे. 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे म्हटले जाते, त्याच धर्तीवर परंतु उपहासाने तलाठी पदाची महती वर्णिताना 'जे न लिहिले ललाटी ते लिहील तलाठी' असे म्हटले जाते. सरकारी व्यवस्थेतील या महत्त्वाच्या पदासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागातर्फे रिक्त पदावर भरती प्रक्रिया पार पाडली गेली. १७ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर दरम्यान परीक्षा झाली.

या दरम्यान काही परीक्षा केंद्रांवर आधुनिक तंत्राचा वापर करत कॉपी करण्यात आल्याचे प्रकार उघडकीस आले. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमार्फत पार पडलेल्या परीक्षेचे निकाल जाहीर झाले आणि अनेकांचे प्रामाणिकपणे अभ्यास करून तलाठी होण्याचे स्वप्न उद्ध्वस्त झाले. विद्यार्थ्यांनी निवड प्रक्रियेवर आक्षेप घेतला. ज्या संस्थेमार्फत परीक्षा घेण्यात आल्या त्या संस्थेच्या कर्मचा-यांनीच तलाठी परीक्षेत उमेदवारांना कॉप्या पुरवल्या म्हणे! पेपरफुटीचा तपास पूर्ण न करताच निकाल जाहीर करणे संतापजनक आहे. या परीक्षेतील वेळोवेळी उघड झालेल्या गैरप्रकारांबाबत समन्वय समितीने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तलाठी भरती घोटाळ्याचा न्यायालयीन एसआयटी नेमून तपास करावा अशी मागणी केली आहे. यावरून तलाठी भरती प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार झाला हे उघड आहे. या आधी झालेली परीक्षा ही महापोर्टलद्वारे घेण्यात आली होती. त्यातही मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले होते. त्यानंतर पारदर्शकरीत्या प्रक्रिया पार पाडण्यासाठी टीसीएसकडे परीक्षांची जबाबदारी सोपविण्यात आली होती. पाच तारखेला जाहीर करण्यात आलेल्या निकालात एकाच कुटुंबातील दोन ते तीन विद्यार्थ्यांना सर्वाधिक गुण मिळाल्याचे आढळून आले. यावर देखील विद्यार्थ्यांचा आक्षेप आहे.

याबाबत माध्यमांना प्रतिक्रिया देताना काही जणांनी आपले नाव न सांगता प्रतिक्रिया दिल्या आहेत. कारण सरकारविरोधात बोलल्यास आपले नाव ब्लॅकलिस्टमध्ये जाईल अशी त्यांना भीती वाटते. परीक्षेसाठी नऊशे ते हजार रुपये शुल्क ठेवण्यात आले होते. त्याबाबतही काही जणांनी नापसंती व्यक्त केली होती. मात्र शुल्कवाढीचे कारण देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, परीक्षेचे गांभीर्य रहावे म्हणून शुल्कवाढ केली आहे. असे असेल तर भरती प्रक्रिया पारदर्शक होणे अपेक्षित होते. परीक्षेत गैरप्रकार झाले असा आक्षेप असेल तर पुरावे द्या, कारवाई करू असेही उपमुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. उपमुख्यमंत्र्यांनी आपली जबाबदारी झटकणे कितपत योग्य आहे असा परीक्षार्थींचा सवाल आहे. वेळोवेळी गैरप्रकार उघडकीस येऊनही तसेच गुन्हे दाखल झालेले विद्यार्थीच पुन्हा परीक्षा देऊन सर्वाधिक गुणांनी उत्तीर्ण होत असतील तर सा-याच प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे साहजिक आहे. अतिशय प्रतिकूल स्थितीत अभ्यास करून नोकरी मिळेल या आशेवर जगणा-या तरुणाईला वारंवार अपेक्षाभंगाच्या दु:खाला सामोरे जावे लागणे हे दुर्दैवी आहे. कोरोना काळात खासगी कंपन्यांकडून परीक्षा घेण्याचा सरकारचा निर्णय आरोग्य खात्यातील भरतीच्या वेळी वादग्रस्त ठरला.

त्यामुळे ही भरतीच रद्द केली गेली आणि टीसीएस व आयबीपीएस या नामांकित कंपन्यांना हे काम देण्यात आले. टीसीएस ही टाटा समूहातील नामांकित कंपनी तर आयबीपीएसला केंद्र पातळीवरील नोकर भरतीचा दीर्घ अनुभव. त्यामुळे तरुणाईने या निर्णयावर विश्वास ठेवला पण आता त्यालाच तडा जात आहे. टीसीएसच्या कर्मचा-यांनी त्यांच्या नातेवाईकांना या भरतीत कसा फायदा होईल याची काळजी घेतली आणि लातूरमध्ये प्रश्नपत्रिका फोडण्याचे काम केले. त्यामुळे कोणावर विश्वास ठेवावा असा प्रश्न परीक्षार्थींना पडला आहे. तलाठी भरती प्रक्रियेतील घोटाळा उजेडात आल्यानंतर त्याबाबत कारवाई करण्याचे सोडून महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी धमकीवजा विधान केले. यावरून सरकारला घोटाळ्याबाबत काहीच सोयरसुतक नाही असे दिसते. प्रत्येक परीक्षेतील गोंधळाबाबत तरुणाई आक्षेप घेत आहे मात्र, सरकार पेपरफुटीविरुद्ध कठोर कायदा करण्यास तयार नाही असेच दिसते. अलिकडे सर्वच परीक्षांमध्ये गैरप्रकार होत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, त्याबाबत सरकारची 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी धारणा बनली असावी!

# लातूर येथील डी. एस. कराड फिजिओथेरपी क्लिनिक येथे गुरूवारी फिजिओथेरपी उपचार शिबिर



लातूर, दि. १७ – येथील डी. एस. कराड फिजिओथेरपी क्लिनिक व एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार, दि. १८ जानेवारी रोजी सकाळी ९ ते १ या वेळेत डी. एस. कराड फिजिओथेरपी क्लिनिक, पाच नंबर चौक, एम.आय.डी.सी. परिसर, कळंब रोड, लातूर येथे सर्व वयोगटातील नागरीक, रुग्ण व कामगार यांच्यासाठी फिजिओथेरपी उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या फिजिओथेरपी उपचार शिबिरात मानदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, खांदादुखी, मणक्याचे आजार, गुडघेदुखी, हातापायांना मुंग्या येणे, सांधेदुखी, संधीवात, अपघातात फॅक्चर झालेले रुग्ण, हृदयरोग, फुफ्फुसाचे आजार, पक्षघात, अर्धांगवायू, अपघाग्रस्त मेंदू रुग्ण, विविध प्रकारच्या शस्त्रक्रियेचे रुग्ण, मार लागलेले खेळाडू अशा विविध आजारांच्या रुग्णांवर अल्प दरात तज्ज्ञांकडून विविध प्रकारच्या व्यायामाव्दारे फिजीओथेरपी उपचार करण्यात येणार आहेत. गंभीर आजाराच्या रुग्णांवर एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयात माफक दरात पुढील उपचार करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर सर्वसामान्य नागरीक, विविध आजाराचे रुग्ण आणि कष्टकरी कामगार यांनी आपली दिनचर्या कशी राखावी या विषयी फिजीओथेरपीचे तज्ज्ञ डॉक्टर मार्गदर्शन करणार आहेत. सदरील फिजिओथेरपी उपचार शिबिराचा विविध आजाराचे रुग्ण, कामगार व नागरीकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड व प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी केले आहे.

# आतड्यांमधील जमलेली घाण झपाट्याने काढून टाकतील 'हे' ७ पदार्थ? बद्धकोष्टतेचा त्रास पुन्हा होणार नाही!

बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करण्यासाठी आहारात काही घटकांचा समावेश करणं आरोग्याला फायदेशीर ठरू शकतं. बद्धकोष्ठता किंवा ज्याला इंग्रजीत उेपीींळरींळेप कॉन्स्टिपेशन म्हणतात, हे शब्द आपल्या कानावरून गेले नाहीत असं होणारच नाही. खाण्याच्या, झोपण्याच्या चुकीच्या सवयींमुळे अनेकांमध्ये बद्धकोष्ठतेचा त्रास वाढत आहे. या त्रासामुळे काही पदार्थांच्या सेवनाचा आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतो. बद्धकोष्ठता हा त्रास बहुतेक सर्व वयोगटातल्या लोकांना होताना दिसून येतो. आहारावर तुमचं आरोग्य अवलंबून असते. त्यामुळे उत्तम आरोग्यासाठी संतुलित आहाराचा समावेश करणं आवश्यक आहे. बद्धकोष्ठतेचा त्रास आटोक्यात ठेवण्यासाठी आहारात काही घटकांचा समावेश करणं आरोग्याला फायदेशीर ठरू शकतं, असे मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटलचे डॉ. प्रदीप राव यांनी सांगितलं असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.बद्धकोष्ठता म्हणजे शौचाला जाताना त्रास होणे. सकाळीच पोट स्वच्छ न झाल्यास, दिवसभर पोट फुगलेले राहाते आणि चिडचिडेपणा वाढतो. तसंच बद्धकोष्ठता समस्या दुर्लक्षित केल्यास, अनेक गंभीर आजार उद्भवू शकतात. अन्नातून शरीराला ऊर्जा मिळते आणि अन्नातून पोषक तत्वे शोषून घेण्यात पचनसंस्था महत्त्वाची भूमिका बजावते. पचनक्रिया सुरळीत राहणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य पचनासाठी मोठ्या आतड्याचे निरोगी असणे आवश्यक आहे. शरीराचा हा अंतर्गत भाग स्वच्छ ठेवणे आणि रोगांपासून संरक्षण करणे खूप महत्वाचे आहे. पोटाचा असह्य गॅस आणि बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करण्यासाठी कोणत्या पदार्थांचा आहारात समावेश करता येईल, जाणून घ्या..बद्धकोष्ठतेचा त्रास दूर करतील खालील पदार्थ?१. अंजीर



अंजीर पाण्यात टाकून ठेवा. त्यानंतर ते खा. तसेच अंजीर दुधासोबतही खाऊ शकता. काही दिवस याचा वापर करा. तुमची बद्धकोष्ठतेची समस्या दूर होण्यास मदत होईल.२. चिया बिया चिया बियांमध्ये ओमेगा–३ फॅटी सिड, अँटिऑक्सिडंट्स आणि मिनरल्स असतात, जे तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी काम करतात. सकाळी कोमट पाण्यात चिया बियांचे सेवन केल्याने पोट चांगल्या प्रकारे साफ होण्यास मदत होते.३. सफरचंद सफरचंद खाल्ल्याने पोटाशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत होते. सफरचंदात पेक्टिन असते, जे बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी आवश्यक फायबर असते. सफरचंद सालीसोबतच खावे, कारण त्यातदेखील फायबर असते.४. भिजलेले तुळशीचे बी तुळशीचे बीज खाल्ल्याने तुम्हाला बद्धकोष्ठतेपासून आराम मिळू शकतो. एक ते दोन मोठे चमचे तुळशीचे बी रात्रभर पाण्यात भिजवत ठेवावे. सकाळपर्यंत हे बी फुगतात. त्यानंतर तुळशी बियांचे हे पाणी प्यायल्याने आराम मिळू शकतो.५. पपई पई खाणे आरोग्यासाठी आणि पोटासाठी चांगले आहे. पपईने पोट साफ राहते. यात भरपूर व्हिटॅमिन डी आहे. म्हणून दररोज शिजवलेले पपई खा. ६. त्रिफळा चूर्ण आणि मनुका देशी तुपाशिवाय आयुर्वेदिक त्रिफळा चूर्ण, मनुका खाण्यानेदेखील बद्धकोष्ठतेपासून तुम्हाला सुटका मिळू शकते. मनुका खाल्ल्याने पचनक्रिया उत्तम होते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही. ७. हिरव्या भाज्या हिरव्या भाज्या आतड्यांना निरोगी ठेवण्याचे काम करतात. तसेच बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यास मदत करतात. म्हणून जास्तीत जास्त आहारात हिरव्या भाज्यांचा समावेश करा. सध्या अनेकांना थंडीच्या दिवसात पचनासंदर्भातील अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. बद्धकोष्ठतेची समस्या अधिक प्रमाणात त्रासदायक ठरत असल्याचे दिसून येत आहे.

# लोकशाही मध्ये लोकांची किंमत काय?

भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. भारतीय संविधान जगातील सर्वोत्कृष्ट लिखित संविधान असून भारताच्या प्रत्येक नागरिकांना समान हक्क अधिकार, संधी, व संसाधन उपलब्ध करून दिले आहे. लोकशाही मध्ये लोकांचे स्थान काय या प्रश्नाचे उत्तर शोधायचे तर संविधान वाचावे लागते. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संविधान वाचायचे तर डोक्यात मेंदू पाहिजे, तो जागृत पाहिजे, मानवता पाहिजे, समतेचा विचार पाहिजे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे राष्ट्र हीत डोक्यात पाहिजे. तरच संविधान वाचण्या लायक व्यक्ती होत असते. संविधान वाचताना व समजून घेताना लक्षात येते की भारतीय संविधानाने एक भारतीय म्हणून किती मोठी ताकत प्रत्येक भारतीय नागरिकांना बहाल केली आहे. संविधानाने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारून लोककल्याणावर भर दिला आहे. संविधानातील प्रत्येक शब्द खुप महत्वाचा असुन विचार करायला लावणारा आहे. संविधानाने कोणताही घटक कल्याणापासुन दुर्लक्षित होणार नाही याची खबरदारी संविधानाच्या माध्यमातून संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली आहे. प्रत्येक नागरिकांना समान अधिकार, समान स्थान व समान संधी उपलब्ध करून दिल्याने श्रीमंत विरुद्ध गरीब यामधील भेदच कमी करून गरिब आणि श्रीमंत यांना एका लाईन मध्ये बसवले. हजारो वर्षांपासून विषमतेच्या नावाखाली माणसाला माणसापासून दुर ठेऊन मानसाच्या सावलीचा, वाणीचा व स्पर्शांचा विटाळ येथील काही बुद्धीहीन व विकृत लोकांना होत होता. तो विटाळ दुर करून जात धर्म न बघता एक भारतीय माणूस म्हणून सर्व जन सारख्याच प्रमाणात राष्ट्रीय संपती व नैसर्गिक संपतीचा उपभोग घेऊ शकतात. देशाच्या सत्तेत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी होण्याचा, सत्ताधारी लोकांवर नियंत्रण ठेवून लोककल्याणकारी कामे करून घेण्याचाही अधिकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक भारतीयांना दिला आहे. सत्तेत जनप्रतिनिधी कोण असावे याचा संपूर्ण अधिकार मताधिकाराच्या माध्यमातून प्रत्येकाच्या मनगटात दिलेला आहे. आणि मताधिकार हा पुर्ण पणे वैयक्तिक अधिकार आहे. निवडणूक प्रक्रिया हि पारदर्शक, निष्पक्ष व निडर असायला पाहिजे जेने करून प्रत्येक नागरिकांना मताधिकार बजावताना स्वतः च्या मतावर स्वाभिमान निर्माण झाला पाहिजे. गरीब व सामाजिक दृष्टीने मागास असलेल्या समुहाचे कल्याण करण्यासाठी सरकार ला नियोजन करावे लागते. कोणत्याही प्रकारचा भेद न करता प्रत्येक योजनेचा लाभ नागरिकांना द्यावा लागतो. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका व प्रसारमाध्यमे हे भारताच्या प्रत्येक नागरिकांच्या कल्याणासाठी काम करण्यासाठी निर्माण केलेले आहे. निवडणूकीच्या माध्यमातून निवडून येऊन लोकप्रतिनिधी नी स्वतः ची घरे न भरता आपल्या मतदार संघात जाऊन जनतेच्या समस्या सोडवायला पाहिजे. यासाठी लोकप्रतिनिधींना मानधन, प्रवासखर्च, मोबाईल खर्च, कार्यालय खर्च सर्व काही मिळते म्हणजे निवडून दिलेला प्रतिनिधी आपल्या मतदार संघाचा राजा नाही तर लोकांचा सेवक असतो आणी त्याचा मोबदला त्यांना मिळत असतो. कार्यकारी मंडळ अर्थात सर्व प्रशासकीय यंत्रणा ग्रामपंचायत सचिवा पासुन तर मंत्रालयीन सचिवापर्यंत सर्व नोकरदार वर्ग हा जनतेची सेवा करण्यासाठी असतो. शासकीय योजना व लाभ जनते पर्यंत पोहचवुन लोककल्याण याच लोकांद्वारे केले जाते. एक विचार करा एक भारतीय नागरिक म्हणून नागरिकांच्या हितासाठी त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी ग्रामपंचायत सरपंचापासुन तर देशाच्या प्रधानमंत्री पर्यंत आणि ग्रामपंचायत सचिवापासून तर मंत्रालय सचिवापर्यंत सर्व काही नागरिकांच्या कामासाठी आहेत. म्हणजे एवढा मोठा थाट फक्त नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आहे. सोबतच कुठे अन्याय अत्याचार झालाच तर न्यायासाठी राजकीय व सरकारी हस्तक्षेप नसलेले स्वतंत्र असे न्यायालय आहे. राजेशाही मध्ये राजा स्वतः च्या कल्याणासाठी व संरक्षणासाठी वेगवेगळ्या लोकांची नेमणूक करून स्वतः चे वर्चस्व प्रस्थापित करत होते. लोकशाही मध्ये सर्व यंत्रणा नागरिकांच्या कल्याणासाठी व संरक्षणासाठी असल्याने लोकशाही मधील खरा राजा हा जनताच आहे. लोकशाही ने सर्वसामान्य मानसाला राजाचा दर्जा व सन्मान निर्माण करून दिला आहे. परिस्थिती नुसार लोककल्याणासाठी एखादा कायदा निर्माण जरी करायचा तरी तो कायदा निर्माण करण्याचा अधिकार कायदेमंडळाला संविधानाने दिला आहे. परंतु लोकांनी संविधान वाचले नाही समजून घेतले नाही. म्हणून लोकांना स्वतः चे अस्तित्व व स्वतः ची किंमत समजली नाही. लोकशाही मध्ये स्वतः चे घरे भरता यावी म्हणून ज्यांनी सत्ता हाती घेतली त्यांनी लोकशाहीची मुळे सर्वसामान्य लोकांपर्यंत जाऊच दिली नाही. लोकांना संविधान, हक्क अधिकार, राष्ट्रवाद या विषयी जागृत करण्या ऐवजी लोकशाही चा उल्लेख केवळ निवडणूक पुरता करून मताची पेटी भरून घेण्यासाठी केला गेला. आणि मागील काही वर्षापासून तर लोकांना निव्वळ धर्माच्या नावाखाली भावनिक व मुर्ख बनवून हक्क अधिकार, न्याय, आणि सरकारला प्रश्न विचारणाऱ्यांना तुरुंगात पाठवले जात आहे. कर्म लपवण्यासाठी धर्माचा आधार घेतला जात आहे. लोककल्याणाचे कामे न करता जनतेच्या कल्याणाचे पैसे उद्योगपतींच्या घशात घालून लोकशाही ला हुकुमशाही व भांडवलशाही मध्ये ढकलले जात आहे. शिक्षण, नोकरी, महागाई व सत्य बोलणारा दोषी तर धर्मांध हा राष्ट्रप्रेमी म्हणून घोषित केले जाते. सरकारच्या सर्व संस्थांनी स्वतः जनतेचे प्रश्न, समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधने आवश्यक असताना आजची परिस्थिती अशी झाली की जनताच सरकार दरबारी प्रश्न मांडत आहे तरीही सरकार दखल घेत नाही. शेतकरी, विद्यार्थी, महिला, कर्मचारी, बेरोजगार, खेळाडू अशा प्रत्येक वर्गातील समस्या वाढत असताना सरकार मात्र यावर लक्ष न देता धर्माच्या नावाखाली भावनिक बनवून हक्क अधिकारा पासून दुर नेले जात आहे. जर जनतेलाच हक्क अधिकार यापासून दूर ढकलले जात असेल तर सरकारचे व इतर संस्थांचे काम काय हा प्रश्न प्रत्येक नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे. निवडणुकीच्या माध्यमातून जनता आपले प्रतिनिधी निवडून सत्ता परिवर्तन करत असते. परंतु इलेक्ट्रॉनिक मशीनच्या माध्यमातून मताची हेराफेरी व घोटाळे झाल्याच्या अनेक घटना उघडकीस होऊन, जनता इलेक्ट्रॉनिक मशीन बंद व्हायला पाहिजे याची मागणी करून ही ती मशीन बंद होत नसेल तर संविधानाने ज्यांना राजा बनवले त्याच राजाला इलेक्ट्रॉनिक मशीन च्या माध्यमातून स्वतः ची पोळी भाजणाऱ्या व द्वेष पसरवणाऱ्या सरकारने भिकारी बनवले. जर जनताच म्हणत असेल आम्हाला इलेक्ट्रॉनिक मशीन नको आमचा इलेक्ट्रॉनिक मशीन वर विश्वास नाही तरीही निवडणूक आयोग सरकारच्या मदतीने इलेक्ट्रॉनिक मशीनच जर जनतेवर लादत असेल तर जनतेच्या मताला किंमत आणि लोकशाही कुठे हा प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे. इव्हिएमच्या माध्यमातून निवडून येण्यासाठी लोकांच्या मताची गरज नाही. जेथे लोकांच्या मतांची गरजच नाही तिथे लोक कल्याणाचे काम कोण आणि का करणार? जर लोककल्याणकारी कामे करायचे असते तर अगोदर लोकांच्या मताचा आदर केला असता. लोक शिक्षण, रोजगार यावर बोलत असताना सरकार धर्माचा आधार घेऊन लोकांचे शिक्षण, रोजगार बंद करत आहे. याचाच अर्थ लोकशाही मध्ये लोकांच्या मताला किंमत राहली नाही. जनता राजा असुनही गुलामासारखे हाल सुरू आहेत. आणि याला सर्वस्वी दोष सरकारचा ही नाही. तर जनतेचाही आहे. स्वार्थी राजकारण्यांच्या धार्मिक व भावनिक आमिषांना भुलुन चुकीचे उमेदवार निवडून दिले गेले, जनतेचे प्रतिनिधी असलेल्यांनी जनतेचे प्रश्न न सोडवता स्वतः ला आर्थिक भक्कम बनवले. शेकडो करोडोचा भ्रष्टाचार केल्याने आज जनतेचे प्रतिनिधी असुनही, जनतेचे प्रश्न वाढत आहेत हे समजून ही जनतेची बाजु घेता येत नाही. सत्य बोलले किंवा सरकार विरोधात बोलले तर वेगवेगळ्या माध्यमातून वेगवेगळ्या कार्यवाही केल्या जातात. जेथे जनप्रतिनिधी च व्यवस्थेच्या समोर हतबल झाले असतील तेथे जनतेची काय परिस्थिती असेल? हे सर्व सुरळीत करण्यासाठी आणि लोकशाही टिकवून लोकांच्या मताला किंमत मिळवून देण्यासाठी इव्हिएम ला दुर सारून बँलेटपेपरवर निवडणुका झाल्या तर अर्धे प्रश्न सुटतील. परंतु यासाठी धर्म, धार्मिक स्थळे हे बाजूला ठेवून लोककल्याण, शिक्षण, आरोग्य, रोजगार व राष्ट्रप्रेम यावर सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. तरच लोकशाही व लोकांच्या मताला किंमत राहील.

*********

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# व्यायाम करूनही वजन कमी होत नाही; तुम्ही या चुका तर करत नाहीत ना?

निरोगी राहण्यासाठी वजनाकडे लक्ष देणे खूप गरजेचे आहे. अनेकदा लोक त्यांच्या वाढत्या वजनाकडे लक्ष देत नाहीत, पण जेव्हा त्याचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागतो तेव्हा ते वजन कमी करण्याचा प्रयत्न करू लागतात. लठ्ठपणा ही एक मोठी समस्या आहे. याचा परिणाम तुमच्या संपूर्ण आरोग्यावर होतो.अर्थात तुमचे वजन वाढत असेल तर ते कमी करणे गरजेचे आहे. मात्र यासाठी घाई न करता आरोग्यदायी सवयींवर भर द्यावा. अनेकदा लोकांना वजन कमी करण्याची घाई असते आणि त्यामुळे त्यांच्याकडून अनेक चुका होतात, ज्यामुळे वजन कमी होण्याऐवजी वाढू लागते.विशेषत: महिला वजन कमी करण्यासाठी अनेक चुका करतात, ज्यामुळे हार्मोनल बॅलेन्ससह अनेक गोष्टींवर परिणाम होतो. वजन कमी करताना कोणत्या चुका टाळाव्यात? याबद्दल जाणून घेऊया.जेवण वगळणे आपण जे काही खातो त्याचा थेट परिणाम आपल्या वजनावर होतो. वजन कमी करण्यासाठी अनेकदा लोक जेवण वगळतात. पण प्रत्यक्षात यामुळे वजन कमी होत नाही, उलट त्यामुळे चयापचय मंदावतो. तसेच, जेव्हा तुम्ही दीर्घकाळानंतर काहीही खाता तेव्हा तुम्ही जास्त खाता आणि वजन कमी होण्याऐवजी वाढू लागते.तज्ज्ञांच्या मते, वजन कमी करण्यासाठी अशा अनेक आहाराची शिफारस केली जाते, ज्यामध्ये कर्बोदकांचा समावेश नाही. परंतु बहुतेक उच्च–कार्ब पदार्थांमध्ये देखील उच्च फायबर असते. आपल्या पचनसंस्थेचे योग्य कार्य करण्यासाठी फायबर खूप महत्वाचे आहे. म्हणून, आपल्या आहारात उच्च फायबर आणि प्रोसेस्ड फूड्स जसे की फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्य समाविष्ट करा.प्रोटीन वजन कमी करताना प्रोटीन रीच डाएटवर लक्ष केंद्रित करा. तुम्ही व्यायाम करत असाल तरच तुमच्यासाठी प्रथिने आवश्यक आहेत असे अनेकदा लोकांना वाटते. पण प्रत्यक्षात तसे नाही. प्रथिने शरीराला ऊर्जा देते, चयापचय सुधारते आणि स्नायूंसाठी देखील महत्वाचे आहे. हे वजन कमी करण्यास देखील मदत करते.

# भारतीय संरक्षणदलांनी पुढेच जावे; पण जरा मागचेही पाहावे

– सी.उदय भास्कर सारी समरगीते, सैनिकांवरल्या साऱ्याच कविता न थांबता पुढे–पुढे जाणाऱ्या सैनिकाचे गुणगान करतात. पण पुढे म्हणजे कुठल्या दिशेला जायचे हे ठरवावेच लागते आणि त्यासाठी जरा मागे वळूनही पाहावे लागते. ही दिशा ठरवण्याचे काम धोरणकर्त्यांचे असते. आजघडीला असे मागे वळून पाहिल्यास दिसेल ते २०२२ पासून सुरूच असलेले युक्रेनमधील युद्ध आणि २०२३ च्या ऑक्टोबरपासून गेले १०० दिवस सुरू असलेला इस्रायल– पॅलेस्टाइन संघर्ष. या रणभूमींशी भारतीय संरक्षण दलांचा थेट संबंध नाही, पण आणखीही काही मुद्दे विचारात घेतल्यास धोरणकर्त्यांपुढे असलेल्या आव्हानांचा नकाशाच स्पष्ट होईल.किम–रशिया यांच्यात लष्करी देवाणघेवाणीची शक्यता सुरुवात २०२२ पासून करू. रशियाने फेब्रुवारी २०२२ पासून केलेली चढाई आणि तिला युक्रेन देत असलेले प्रत्युत्तर पाहिल्यास एक निष्कर्ष नक्की निघतो की, 'शीतयुद्ध–काळाच्या समाप्तीनंतर कोणतेही मोठे देश लढाई–चढाईच्या फंदात पडणार नाहीत, भूभागावरून तर नाहीच नाही' असा जो काही विश्वास होता तो धुळीला मिळाला आहे. हेलसिंकी करार (१९७६) सर्वांनी मान्य केल्यामुळे युरोप खंडातल्या देशांच्या सीमा तरी अनाघ्रातच राहणार असल्याची जी समजूत झाली, ती जर्मनीच्या १९८९ मधल्या एकीकरणानंतर बळकट झाली होती, पण तिलाही फेब्रुवारी २०२२ मध्ये सुरुंग लागला.'नाटो' संघटना पूर्व युरोपातल्या देशांना कवेत घेत असल्यामागे अमेरिकेची फूसच असल्याचा आरोप पराकोटीला नेऊन रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे आक्रमणाचे समर्थन करताहेत आणि येत्या महिन्याभरात या युक्रेनयुद्धाला दोन वर्षे पूर्ण होत असली तरी तिसऱ्या वर्षीही ते चालूच राहील अशी चिन्हे आहेत. म्हणजे रशियासारखा अण्वस्त्रसज्ज देश, सलग महिनोनमहिने कुठल्याशा भूभागाच्या वादापायी पारंपरिक शस्त्रास्त्रांनिशी लढत राहातो आहे त्या देशाने सहनशक्तीची परिसीमा वगैरे युक्तिवाद वापरले तर अण्वस्त्रसज्जतेचीही चुणूक दिसेल का हा प्रश्न अनुत्तरित आहे.भारताच्या संदर्भात हे महत्त्वाचे अशासाठी की, १९९३ मध्ये झालेला शांतता करार धुडकावून चीनने २०२० मध्ये लडाखच्या गलवान खोऱ्यात घुसखोरी केली. तेव्हापासून आजतागायत दोन्ही देशांनी संयम पाळलेला असला तरी, बीजिंगमधून २०२४ मध्ये कुरापतीचा विचार केला जाणारच नाही याची काही खात्री नाही.

आता २०२३ च्या धड्यांकडे पाहू. सात ऑक्टोबरला हमासने केलेल्या दहशतवादी हल्ल्याला इस्रायलकडून निर्दय पत्युत्तर मिळते आहे. यावर काही तोडगा निघण्याची शक्यता अद्यापही दिसत नाही. पॅलेस्टाइनची समस्या ही फार आधीपासून आहेच. या समस्येचे इस्रायली वसाहतखोरी, दमन आणि वंशभेद असे पदरही वेळोवेळी उघड झालेले आहेत. पण या समस्येची उकल केवळ सशस्त्र हल्ल्याने होऊ शकत नाही. हे विसरून हमाससारख्या राष्ट्रबाह्य (जरी त्यांना कथित पॅलेस्टाइन सरकार आणि इराणचा पाठिंबा असला तरी राष्ट्रबह्यच) संघटनेने हल्ल्याचा माथेफिरूपणा केला. या माथेफिरू बॉम्बहल्ल्याची आणि त्याच वेळी इस्रायलींना ओलीस ठेवण्याच्या प्रकाराची तीव्रता जबर होतीच पण संपूर्णत: गोपनीयता पाळून, इस्रायलसारख्या तगडी गुप्तचर यंत्रणा बाळगणाऱ्या देशाला ठार बेसावध गाठून हमासने हे घडवले. त्यासाठी हमासने वापरलेली रॉकेटही नव्या पद्धतीची होती.हमास–हल्ल्याला प्रत्युत्तर देणे सुरू असताना डिसेंबरपासून येमेनमधले हूथी बंडखोर कार्यरत झाले. हेसुद्धा राष्ट्रबाह्य शक्ती म्हणावेत असे लोक. पॅलेस्टिनींवर इस्रायलने चालवलेल्या जुलमाचा निषेध म्हणून या हूथींनी, इस्रायलशी दूरान्वयानेच संबंध असलेल्या व्यापारी जहाजांवर हल्ले आरंभलेले आहेत. लाल समुद्रातील या हल्ल्यांचा परिणाम जागतिक –व्यापारावर होऊ लागला, तेव्हा अमेरिकेला समविचारी देशांचे 'नौदल कृती पथक' स्थापन करण्याची खटपट करावी लागली. पण नौदलांच्या या पथकातले देश नक्की 'समविचारी' आहेत का? ब्रिटन, इटली, फ्रान्स, स्पेन, ग्रीस तसेच इतर देशांचा या पथकात समावेश आहे– यापैकी कैक देशांनी इस्रायलने मानवी हक्कांचा विचार करावा अशा मागणीचे ठराव अमेरिकेच्या विरोधाला न जुमानता संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत आणले होते. त्यामुळे अमेरिकेला लाल समुद्रातील या पथकाची जबाबदारी मर्यादितच असल्याचे भान सतत पाळावे लागणार आहे.इथेही 'तगडी यंत्रणा बाळगणाऱ्यांना एखाद्या राष्ट्रबाह्य शक्तीने ठार बेसावध गाठणे' हे सूत्र दिसून येते. त्या हूथींकडे धड नौदल म्हणावे असे काही नाही. ड्रोनसारखे तुलनेने स्वस्त तंत्रज्ञान वापरून त्यांनी व्यापारी जहाजांवर स्फोटके डागली. हूथींनी याआधी क्षेपणास्त्रेही वापरली होती, हे लक्षात घेता त्यांना कुणाचा (इराणचा) कसा छुपा पाठिंबा आहे आणि शस्त्रास्त्रांची तस्करी कशी होते या मुद्द्यांपेक्षा आत्ता आणि यापुढे हूथींचे हल्ले कोणत्या थराला जाणार हा प्रश्न अधिक तातडीचा ठरतो. भारतालादेखील ही तातडी जाणवावी, अशी परिस्थिती २३ डिसेंबरला उघड झाली. अरबी समुद्रात, भारताच्या किनाऱ्यापासून २०० सागरी मैलांच्या अंतरावर 'एमव्ही केम प्लूटो' या जहाजावर हल्ला झाला. यानंतर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी तातडीची बैठक बोलावली होती.युक्रेन, इस्रायल आणि व्यापारी जहाजे या सर्वांवरील हल्ले बेसावध गाठूनच झालेले आहेत. गुप्तचर यंत्रणांच्या मर्यादा तर यातून उघड होतातच पण व्यूहात्मक ताणसुद्धा यातून लक्षात यावा. हल्ले होऊ शकतात, होत राहू शकतात, याची शक्यता कितपत गृहीत धरायची, कुठेकुठे सज्जता ठेवायची आणि त्यासाठी उपलब्ध संसाधनांचाच खुबीने वापर कसा करायचा, हे यापुढे ठरवावे लागणार आहे. त्यासाठी कुठकुठले तंत्रज्ञान कोणाकोणाच्या हातांत पोहोचले आहे वा असू शकते, यावरही नजर ठेवावी लागणार आहे.भारत यासंदर्भात उत्तमच कामगिरी करेल, असे म्हणणे धाडसाचे अशासाठी की आपला बेसावधपणाचा इतिहास केवळ ऑक्टोबर १९६२ मधील चिनी आक्रमणापुरता नसून कारगिल (१९९९), मुंबई हल्ला (२००८) आणि गलवान (२०२०) इतका तो ताजा आहे. या प्रत्येक वेळी 'मंत्रिमंडळाच्या संरक्षण समिती'सह सर्वच उच्चपदस्थ आधी बुचकळ्यात पडले होते, अशाही नोंदी शोधल्यास सापडतील.अर्थात हे मान्य केले पाहिजे की, भारतापुढे खरोखरच अनेक संरक्षण–आव्हाने आहेत.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात स्व. खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात संपन्न




लातूर :- महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील महात्मा बसवेश्वर कुस्ती प्रशिक्षण केंद्राद्वारा सर्व कुस्तीगिरासमवेत ऑलम्पिकवीर स्व. खाशाबा जाधव यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य सरकारच्या आदेशानुसार राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय स्व. खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ. राजकुमार लाखादिवे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, क्रीडा समिती सदस्य डॉ. जितेंद्र देशमुख, बाबासाहेब क्षीरसागर, प्रा. आशिष क्षीरसागर, कार्यालयीन प्रमुख श्री नामदेव बेंदरगे आणि पालक वर्ग उपस्थित होते. यावेळी कुस्तीगीरांना स्व. खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय खेळाडू बाळासाहेब जमादार याला राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदविला त्याबद्दल सर्व पालकांच्यावतीने पाच किलो बदाम बक्षीस म्हणून देण्यात आले, बारामती येथे पार पडलेल्या कुस्ती स्पर्धेत ६३ किलो वजन गटात महेश कांदे यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला त्याबद्दल त्याला दोन किलो बदाम देण्यात आले. यावेळी पालक म्हणून तानाजी कोकाटे यांनी आपले मनोगत व्यक्त करून कुस्ती प्रशिक्षणाविषयी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील पालक वर्ग खूप मोठ्या प्रमाणात उपस्थित होता यात अभिमन्यू जमादार, तानाजी कोकाटे, श्रीकांत शेळके, अविनाश कतलाकुटे, अरुण जाधव, कपिल धायगुडे, अनिल नानवटे, नवनाथ धायगुडे, दयानंद आंबेकर आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. आशीष क्षीरसागर व आभार प्रदर्शन प्रा. विष्णू तातपूरे यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# प्रभाग क्रमांक ४ मधील ग्रीन बेल्ट वरले अतिक्रमण काढा भीम आर्मीचे उप आयुक्त मयुरा शिंदेकर यांना निवेदन



लातूर :- प्रभाग क्रमांक ०४ मधील माधव नगर या ठिकाणी महानगरपालिकेच्या ग्रीन बेल्ट वरील अतिक्रमण काढून प्रभागातील नागरिकांना न्याय द्यावा गेल्या तीन वर्षांपासून स्थानिक च्या नागरिकांची मागणी होत असताना महानगर पालिका अतिक्रमण करणाऱ्यांना पाठीशी घालत आहे म.न.पा चे आयुक्त अमन मित्तल यांनी नोटीस देऊन सुध्दा त्या ठिकाणचे अतिक्रमण निघत नाही ही जागा महानगरपालिकेची आहे म.न.पा चे अधिकारी अतिक्रमण करणाऱ्यांना पाठीशी घालत असल्याची चर्चा आता प्रभाग क्रमांक ०४ मध्ये ऐकायला मिळत आहे प्रभाग क्रमांक ०४ मध्ये लहान मुलांना खेळण्यासाठी जागा नाही फिरण्यासाठी बसण्यासाठी जागा नाही तरी महानगर पालिकेने अतिक्रमण काढून प्रभागातील नागरिकांना न्याय द्यावा अन्यथा महापालिकेच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी निवेदनाद्वारे देण्यात आला यावेळी भिम आर्मी भारत एकता मिशन चे महाराष्ट्र प्रदेश संघटक अक्षय धावारे जिल्हा संघटक बबलू गवळे परमेश्वर ताकपीरे विकास बनसोडे आयुष गंडले सुमित शिंदे रितेश वाघमारे गणेश वाघमारे रूषिकेश गायकवाड सोहम शिंदे सुशिल गायकवाड आदी प्रभागातील नागरिक उपस्थित...

## नगर भुमापन कार्यालयातील अभिलेखा कक्षात विना परवानगी येणाऱ्या इसमावर गुन्हा दाखल

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर कँप ५ येथील नगर भुमापन कार्यालयात होत असलेल्या भ्रष्टाचारा विरुध्द प्रहार संघटनेने दोन दिवसापुर्वी आंदोलन केले होते. या आंदोलना दरम्यान बाहेरचा एक अनोळखी इसमाने अभिलेखा कक्षात प्रवेश करुन तो कागदपत्रे काढत असल्याचा व्हिडियो या आंदोलन कर्त्यांनी भुमापन अधकारी यांना दाखवला होता तेव्हा याच व्हिडियो मधे दिसणाऱ्या अनोळखी इसमा विरुध्द अनिल माने यांनी हिल लईन पोलिस ठाण्यत गुन्हा दाखल केला आहे. करण सिंग असे त्या इसमाचे नाव असल्याचे एफ आय आर मध्ये नमुद केले आहे. उल्हासनगर कँप ५ येथील नगरभुमापन कार्यालय हे दलालांचा अड्डा बनला आहे. या कार्यालयात बिल्डरांचे कामे लवकर होत असुन सर्व सामान्य व्यक्ती हा चक्करा मारुन परेशान होतो. तेव्हा या कार्यालयातील भ्रष्टाचाराची पोल खोल करण्यासाठी प्रहार पक्षाचे ड स्वप्निल पाटील यांनी आपल्या पदाधिकाऱ्यासह आंदोलन केले, तेव्हा सदर आंदोलना दरम्यान या कार्यालयात बाहेर चा व्यक्ती प्रवेश करुन कागदपत्रे हाताळत असल्याचे दिसुन आले तेव्हा नगर भुमापन अधिकारी अनिल माने यांनी करन सिंग या व्यक्ती विरुध्द हिल लाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# आंबेडकर भवन (दादर) येथे राज्यस्तरीय कविसंमेलन व वर्धापनदिन सोहळा संपन्न

मुंबई / प्रतिनिधी :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला साहित्यिक विचारमंच, महाराष्ट्र आयोजित प्रथम वर्धापन दिन सोहळा, पुरस्कार वितरण तथा राज्यस्तरीय कवी संमेलन सोहळा मा. विनोद नारायण जाधव (प्रमुख सल्लागार लॉपिंग ग्रुप, बिल्डर अँड डेव्हलपर आणि कायदेशीर सल्लागार ) यांच्या अध्यक्षतेखाली दादर मुंबई गोकुलदास पास्ता रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे थाटात संपन्न झाला. या कविसंमेलनाचे उद्घाटक - प्रमुख अतिथी भीमरावजी यशवंत आंबेडकर तर कविसंमेलनाध्यक्ष ज्येष्ठ कविवर्य मा. बबन सरवदे, समूह अध्यक्ष मा. नरेंद्र अनंत पवार, उपाध्यक्षा मा. माला मेश्राम, सचिव अनिल सावंत हे होते. त्याचप्रमाणे विचार मंच्यावर उपस्थितीत कल्पना टेंभूर्णीकर, डॉ. हरिश्चंद्र धिवार, अर्चना चव्हाण, सुभाष मानवटकर, राजीव खंडारे, डॉ. मधूकर दिवेकर, गणेश मोरे इत्यादी प्रामुख्याने हजर होते. इतर सर्व सन्मानिय ज्येष्ठ कवी रानकवी जगदीप वनशिव, लोककवी सीताराम नरके, प्रमोद सुर्यवंशी, संविधान प्रचार प्रचारक नूरखां पठाण, सत्यसागर अवचार, मनीषा मेश्राम, विनोद सोनकांबळे, ज्योती सोनवणे, सौ. अंजली देशपांडे, सौ. रोहिणी पराडकर, समाधान दिनकर लोणकर, नीता पाटील, दिनेशकुमार पडवळ, संदीप पाटील, सौ. सुमती नलावडे, प्रा. हंसराज रंगारी, यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दुपारच्या सत्रात कविसंमेलन घेण्यात आले जवळपास ३६ निमंत्रित कवी कवयित्री यांनी



सहभाग नोंदविला. तुषार नेवरेकर, आनंद गायकवाड, विजय कांबळे, गिताश्री नाईक योगिता कोठेकर, प्रांजली काळबेंडे, चंद्रकांत जोगदंड, वर्षा फटाकळे, डॉ. छाया शिरसाठ, साक्षी डोळस, मीरा वासनिक, सविता अहिरे, संतोष खंडारे, मिलिंद खोब्रागडे, सुरेश पाटील, संजय जाधव, आशा डाहाट यांनी कविता सादर केल्या.

५ कवींना विशेष पुरस्कार देवून गौरविण्यात आले. नम्रता खरे व धम्मोदय वाघमारे यांचा पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला. विचारांचा...लक्ष्मी ड्रा, ही एक नवी संकल्पनेतून विजेत्यांना संविधान प्रत देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली गायकवाड खंडारे, कांचन लांजेकर, संविधान उद्देशिका वाचन मा. माला मेश्राम यांनी करून समूह प्रास्ताविक वाचन मा. नरेंद्र पवार यांनी केले आणि गोड शब्दात कार्यक्रमाचा समारोप, आभारप्रदर्शन मा. प्रा. नानाजी रामटेके यांनी केले.


# विद्यापीठाच्या नामांतर आंदोलनाची नामविस्ताराने सांगता झाली, पुढे काय? या विषयावर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी १४ जानेवारी १९९४ ला मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार झाला. २७ जुलै १९७८ ला नामांतराचा ठराव मंजूर झाल्यावरही १६ वर्षे आंदोलन का करावे लागले? हे समजून घेणे आवश्यक आहे. करिता १४ जानेवारी २०२४ ला नामविस्तार दिनी विद्यापीठाच्या नामांतर आंदोलनाची नामविस्ताराने सांगता झाली, पुढे काय? या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, (औरंगाबाद), महाराष्ट्र येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर खंडागळे यांनी केले. ते म्हणाले की, आम्ही शासनाला फार काही मागत नव्हतो तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे विद्यापीठ निर्माण व्हावे अशी माफक मागणी होती. तरीही या आंदोलनाला जातीयवाद्यांनी वेगळे वळण दिल्याने २७ जण शहीद झाले, १४ जण जाळल्या गेले, १०६५ झोपड्या व सहा हजार व्यक्ती बाधित झाल्या. नांदेड येथील वकिलांनी निवेदन देऊन आत्मदहन केले. गौतम वाघमारे यांनी आत्मदहन केले. आपल्या अस्तित्वाचा लढा असल्याने अनेकांनी आपल्या जीवाचे बलिदान दिले. १४ जानेवारी १९९४ ला नामविस्तार झाला. हे संघर्षात्मक दृष्टीने प्रेरणादायी आहे. मात्र या प्रेरणेला निष्प्रभ करण्यासाठी आरएसएस वाल्यांनी मात्र लोकशाहीची वाट लावली. खाजगीकरणातून शिक्षण नाकारले जात आहे. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असे म्हटले जाते. पण या दुधात भेसळ केली जात असेल तर तो गुरगुरणार कसा? सर्व संस्था सत्ताधा-यांनी ताब्यात घेतल्या आहेत. इव्हीएम मशिन मुळे व्यवस्था भांडवलदाराच्या ताब्यात आहे. आपण भिन्न भिन्न गटा तटात विभाजित असलो तरी आपण नेमके कुठल्या मार्गाने जायचे? हे मात्र ठरविले पाहिजे. ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे. ती आपण पार पाडली पाहिजे. सर्व मतभेद बाजूला ठेवून नव्याने संघर्षासाठी पुन्हा सज्ज झाले पाहिजे.

या प्रसंगी एड. चेतन मोरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघर्ष करा आणि संघटीत व्हा असे म्हटले होते. एक गाणे म्हटले जाते की, लाल दिव्याच्या गाडीला कुणाचे योगदान? या गाण्यानंतर तो लाल दिवाच काढून टाकण्याचे प्रयत्न मनुवाद्यांनी चालविले आहेत. संघर्ष करणा-यांचे खच्चीकरण केले जात आहे. नामांतराचा लढा हा अस्पृश्यांच्या स्वाभिमानाचा लढा होता मात्र तो केवळ महारांनीच लढला आणि त्याचे चटके ही सहन केले. माता सावित्रीबाई फुल्यांनी प्रथमतः महिलांसाठी शाळा काढली ज्यामुळे महिला शिकल्या त्यांनी चळवळीला योगदान दिले पाहिजे. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात ५० टक्के राखीव जागांची अंमलबजावणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २ वर्षे ११ महिने १८ दिवस निरंतर पणे मेहनत करून भारताचे संविधान लिहिले. एड. विलास रामटेके म्हणाले की, विद्यापीठ गेटवर जाणारी माणसे तिळगूळ ही घेऊन जातात हे बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाच्या विसंगत आहे. या विषयाला दलित पँथरने लावून धरला. १९९४ ला नामविस्तार झाला, तेव्हा पौनी येथे शिकत असताना प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी फार संघर्ष केल्याचे कळले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर औरंगाबाद येथे शैक्षणिक महाविद्यालयाची उभारणी करीत असताना गोविंद भाई श्रॉफ आणि माणिकचंद पहाडे यांनी येथे महाविद्यालय चालेल काय? असा प्रश्न १९५० ला उपस्थित केला होता. तेव्हा बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, येथे केवळ महाविद्यालयच नव्हे! तर येथे विद्यापीठ सुद्धा असायला हवे. जे साकार झाले आणि या विद्यापीठातून अनेक महनीय व्यक्ती निर्माण झाल्यात. असे होऊ नये म्हणून सध्या महाराष्ट्र सरकारने ६२००० सरकारी शाळा बंद करण्याचा घाट घातला जात आहे. सरकारी शाळेतील शिक्षकांनी शिकवू नये म्हणून तर त्यांना विविध स्वरुपाची कामे दिली जातात. यासाठी भांडवलशाही व्यवस्था मोठ्या शिताफीने प्रयत्नशील आहे. धनराज गोंडाने म्हणाले की, येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली होती तिथे शिक्षणाची दुरावस्था होत आहे तिथे या विद्यापीठाचे नामविस्तार तर झाले पण पुढे काय? हा प्रश्न अनुत्तरित असल्याने हा मार्मिक विषय चर्चेसाठी ठेवला आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास पवित्र बुद्ध धम्म दिला. ज्यासाठी खंड क्रमांक १६ प्रमाणे पाली भाषेचा शब्दकोश लिहिला आहे. बुद्ध धम्माचे ज्ञान व्हावे यासाठी त्यांनी फार प्रयत्न केले. रायरीच्या पुलावर लाँग मार्च रोखण्यात आला तरिही प्रा. जोगेंद्र कवाडे वेशांतर करून सभेला मार्गदर्शन करण्यासाठी औरंगाबाद ला आले होते. असा रोमांचित करणारा नामांतराचा इतिहास उपलब्ध आहे. या इतिहासाचे सिंहावलोकन आपण केले पाहिजे. २२ प्रतिज्ञा हा धम्माचा निचोड आहे. ज्यामुळे समता स्थापित होऊन विज्ञानवादी समाजाची निर्मिती होऊ शकेल. करिता आपण भ्रामक कल्पना सोडल्या पाहिजेत.

प्रमुख वक्ते एड. ओमप्रकाश शिरसाठ म्हणाले की, १९७२ ला दलित पँथरची स्थापना झाली आणि १९७४ ला या लढ्याला सुरूवात झाली. त्यात दलित युवक आघाडी आणि युक्रांद यांचे सुद्धा योगदान होते. नामविस्तार दिनाचे औचित्य लक्षात घेऊन त्या अनुषंगाने आपण सांगोपांग चर्चा केली पाहिजे. वसंत दादा पाटील मुख्यमंत्री असताना हा ठराव विधिमंडळात आला होता. संवैधानिक दृष्टीने दोन्ही सभागृहात नामांतराचा ठराव हा ठराव पास झाला. पुढे दलित आणि सवर्ण असा संघर्ष उभा राहिला ज्याला जातीयवाद्यांनी खत पाणी घातले. यात महार, मांग, चांभार यांची स्थिती काय? हा आपल्या अस्मितेचा प्रश्न होता. करिता असे प्रश्न सोडविण्यासाठी आपण सर्व समावेशक प्रयत्न केले पाहिजेत. पंजाबराव, फुले, शाहू, शिवाजी इत्यादी च्या नावाने विद्यापीठ आहेतच तर मग बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने विद्यापीठ असायला हरकत नको होती. कारण हा लढा समतेचा होता. जे तत्व भारताचे संविधानात कलम १४ प्रमाणे अंतर्भूत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना मर्यादित करून चालणार नाही तर आपण व्यापकता आणली पाहिजे. आपण केवळ संविधान... संविधान म्हणून चालणार नाही. नामांतर चळवळीने अनेक नेतृत्व निर्माण झाले तर अनेकांच्या संसाराची राखरांगोळी झाली. तर मग नामांतराच्या चळवळीतील धग का संपली? या चळवळीत तरुणांचा सहभाग का नाही? हा अंतर्मुख करणारा कळीचा मुद्दा आहे. वर्षावास, चॅटिंग, मेडिटेशन यांच्या पुढे काय? म्हणून या विषयाच्या अनुषंगाने पुढे काय? याचा शोध घेतला पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, यापूर्वी व्यक्त झालेल्या संदेशात आपण थोडी सुधारणा करुया ती म्हणजे भारताचे




संविधानाला केवळ संविधान... संविधान असे म्हणून चालणार नाही कारण ३९५ कलमाचे भारताचे संविधान लिहीत असताना डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी ३९३ क्रमांकाच्या कलमात अशी तरतूद केली आहे की, यापुढे या संविधानास मराठीत भारताचे संविधान, हिंदीत भारत का संविधान तर इंग्रजीत द कॉन्स्टिट्युशन आफ इंडिया अशी तरतूद केली असताना भारतापासून संविधान वेगळे करून उच्चारण का करीत आहोत?म्हणून आपण यापुढे भारताचे संविधान असा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे. दुसरे असे की, ९ मार्च १९२४ ला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी रपव जीसरपळीश अर्थात शिका, संघर्ष करा आणि संघटीत व्हा असा संदेश दिला होता. जे पुढे २० जुलै १९२४ ला स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य ठरले. असे असताना आपण शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असे बिंबवित आहोत? असे म्हणणे म्हणजे मूळ वाक्याचा विपर्यास करणे होय. ज्याचे समाज जीवनावर दुष्परिणाम होत आहेत. ते असे की आपणास शिक्षित झाल्यावर संघटीत होण्यासाठी संघर्ष करायला सांगितले असताना संघटीत होण्यासाठी आपण संघर्ष करीत नसल्याने लाखोंच्या संख्येने विविध संघटनात विभाजित आहोत. करिता आपण संघटीत होण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. आणि संघटीत झाल्यावर सुद्धा हक्क अधिकारासाठी संघर्ष केला पाहिजे. पुढे २० जुलै १९४२ ला नागपूर परिषदेत या त्रिसुत्रीला महत्त्वाकांक्षी व्हा आणि धीर सोडू नका या दोन शब्दाची जोड देऊन पंचसुत्रीचा अवलंब करण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संदेश दिला आहे. हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या समाजात १० डॉक्टर, २० वकील व ३० इंजिनिअर निर्माण होतील त्या समाजाकडे कुणी डोळे वटारून बघणार नाही? असे म्हटले होते. आज समाजात लाखोंच्या संख्येने डॉक्टर, वकील व इंजिनिअर निर्माण झाले आहेत तरी या समाजाची दुर्दशा का होत आहे? कारण या उच्च शिक्षित व्यक्ती समाजाची प्रतिकारशक्ती होऊ शकल्या नाहीत. नामांतर आंदोलनाने नविन नेतृत्व निर्माण केले की दलित पँथरच्या माध्यमातून निर्माण होऊ घातलेल्या नव नेतृत्वाला पायबंद घालण्यात प्रस्थापित यशस्वी झाले आहेत? प्रा. जोगेंद्र कवाडे सरांच्या कार्याचा आपण अभिमान बाळगलाच पाहिजे पण त्या काळात नुकतेच बामसेफ ची स्थापना झाली होती. त्यावेळी मान्यवर कांशीराम आप्रेस्ड इंडिया नावाचे मासिक चळवळीचे मुखपत्र चालवीत होते. त्या मासिकाच्या विशेषांकात लाँग मार्च चे नेतृत्व कुणी केले? (थहे श्रशरव श्रेपस चरीलह?) याचे विवेचन केले आहे? याची शहानिशा होणे आवश्यक आहे. जेणेकरून विद्यापीठाचे नामांतर आंदोलन फुले आंबेडकरी समूहास राज्यकर्ते का बनवू शकले नाही? या चळवळीच्या आंदोलनाची धग का संपली? तरुण चळवळीत का येत नाहीत? विद्यापिठाच्या नामांतर आंदोलनाची नामविस्ताराने सांगता झाली, पुढे काय? याचा उलगडा होऊ शकेल. कार्यशाळेला एड. विलास रामटेके, धनराज गोंडाने, एड. ओ. सी. शिरसाठ, रत्नाकर खंडागळे, एड. चेतन मोरे, साधू आनंद, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE